**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रसिद्धीपत्रक**

- **सेवा हक्क दिनानिमित्त नागरिकांसाठी विशेष संदेश "नागरिकांचा हक्क - गुणवत्तापूर्ण सेवा"**

दिनांक २८ एप्रिल २०२५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालयात मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली सेवा हक्क दिन साजरा करण्यात आला. सेवा हक्क दिनाच्या अनुषंगाने महापालिकेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी नागरिकांना वेळेत आणि प्रभावी सेवा देण्याचा संकल्प व्यक्त करत सेवा हक्क शपथ घेतली. या शपथविधीमध्ये नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण आणि गुणवत्तापूर्ण सेवा देण्याचा निर्धार करण्यात आला. यावेळी, अतिरिक्त आयुक्त डॉ. सचिन बांगर, उपायुक्त प्रसाद शिंगटे, शहर अभियंता दिपक खांबित, सिस्टम मॅनेजर राज घरत, कार्यकारी अभियंता नितीन मुकणे, सामान्य प्रशासन अधिकारी सुनील यादव, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रमोद पडवळ आणि माहिती व जनसंपर्क अधिकारी जितेंद्र कांबळे उपस्थित होते.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत शासन व स्थानिक स्वराज्य संस्थांकडून दिल्या जाणाऱ्या सेवा नागरिकांना वेळेत, पारदर्शक व गुणवत्तापूर्ण पद्धतीने मिळाव्यात, यासाठी महापालिकेने ठोस पावले उचलली आहेत. सेवा वितरणात उत्तरदायित्व आणि पारदर्शकता सुनिश्चित करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. याच पार्श्वभूमीवर, मिरा भाईंदर महानगरपालिकेने RTS MBMC पोर्टल सुरू केले आहे. "आपली सेवा, आमचे कर्तव्य !" या संकल्पनेतून सुरू केलेल्या या पोर्टलवर नागरिकांना घरबसल्या विविध सेवा मिळवण्याची सुविधा देण्यात आली आहे. जन्म व मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, पाणीपुरवठा विभागातील सेवा, कर विभागातील सेवा, परवाना विभागातील सेवा, मंडपासाठी ना हरकत प्रमाणपत्र, अग्निशमन विभाग सेवा, सार्वजनिक आरोग्य विभाग, नगर रचना विभाग तसेच, इतर विभागांमधील एकूण ६५ प्रकारच्या सेवा या पोर्टलद्वारे देण्यात येत आहे. या सर्व सेवा घरबसल्या प्राप्त करण्यासाठी नागरिकांनी https://rts.rtsmbmc.in या लिंकवर भेट देण्याचे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका नागरिकांच्या सेवेसाठी कटिबद्ध असून, प्रत्येक नागरिकाला दर्जेदार, वेळेत आणि पारदर्शक सेवा मिळवून देण्यासाठी सतत प्रयत्नशील आहे.

सेवा हक्क दिनानिमित्त नागरिकांनी आपले अधिकार ओळखून, उत्तम प्रशासनासाठी सक्रिय सहभाग घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.